# ‘सायन्स-आर्ट’ चित्रकला स्पर्धेत प्राची बल्ला पहिली

एक्साइटिंग सायन्स ग्रुपच्या वतीने महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या ‘सायन्स आणि आर्ट’ या स्पर्धेत प्राची बल्ला हिला पहिला क्रमांक मिळाला. योगेश भ्यागी याने दुसरा, तर श्रद्धा कांबळे हिने तिसरा क्रमांक पटकावला. विद्यार्थ्यांना विज्ञान आणि कला यांच्यातील संबंध लक्षात यावा तसेच त्यांच्यातील सृजनशीलतेस वाव मिळावा या दृष्टिकोनातून ही स्पर्धा घेण्यात आली होते. महानगरपालिकेच्या पाच शाळांमधून जवळपास ७० हून अधिक विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. त्यांनी ‘मी शास्त्रज्ञ झालो तर’, ‘सन २०१५ मधील भारतीय शेती’, ‘जगात तंत्रज्ञान नसते तर’ या विषयांवर चित्रे काढली. प्रसिद्ध चित्रकार रवि परांजपे यांनी या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. चित्रकार राधिका सेहगल, सुजाता धारप आणि जयंती पाटील यांनी स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले.